# प्रेस नोट

दिनांक २७/०९/२०२१

**आरोपी लोकसेवक गोपाळ गेणु मावळे, जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था रायगड अलिबाग व आरोपी लोकसेवक सुहास दत्तात्रेय दवटे, मुख्यलिपीक यांचे विरूध्दचे सापळा कारवाईबाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंध विभाग/घटक | रायगड. |
| ठाणे दैनंदिनी नोंद क्रमांक | अलिबाग पोलीस ठाणे नोंद क्र.२४ वेळ १५.०७ वाजता |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) गोपाळ गेणु मावळे, जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, रायगड – अलिबाग<br>२) सुहास दत्तात्रेय दवटे, मुख्यलिपीक,जिल्हा उपनिबंधक अलिबाग, जि. रायगड |
| मागितलेली लाचेची रक्कम | ४०,०००/– रूपये. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ४०,०००/– रूपये |
| थोडक्यात हकिगत | |

यांतील तक्रारदार यांचे मौजे अष्टमी ता.रोहा, जि. रायगड येथील माउली इनक्लेव्ह गृहनिर्माण संस्था स्थापन करणे संदर्भात जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था रायगड अलिबाग या कार्यालयात प्रलंबित प्रकरणाचा निकाल देणेकरीता आरोपी लोकसेवक १) गोपाळ गेणु मावळे, जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, रायगड – अलिबाग, २) सुहास दत्तात्रेय दवटे, मुख्यलिपीक, जिल्हा उपनिबंधक अलिबाग, जि. रायगड यांनी दिनांक २३/०९/२०२१ रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान तक्रारदार यांच्याकडुन ४०,०००/– रूपये लाचेची मागणी करून लाचेची रक्कम दिनांक २७/०९/२०२१ रोजी घेवुन येण्यास सांगितले त्या अनुशंगाने दिनांक २७/०९/२०२१ रोजी आरोपी लोकसेवक यांच्या नमुद कार्यालयात लाचेचा सापळा आजमावला असता आरोपी लोकसेवक क्रमांक २ श्री. सुहास दवटे यांनी तक्रारदार यांच्याकडुन ४०,०००/– रूपये लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर त्यांच्याकडुन लाचेची रक्कम हस्तगत करून नमुद दोन्ही आरोपीत यांना अॅन्टी करप्शन ब्युरो, रायगड अलिबाग पथकाने ताब्यात घेतले असुन पंचनाम्याची पुढील कार्यवाही असेबी रायगड कार्यालयात सुरू आहे.

लाचलूचपत प्रतिबंध विभागातर्फे नागरीकांना अवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवक बद्दल तकार असल्यास लाचलुचपत प्रतिबंध विभाग ठाणे परिक्षेत्र ठाणे यांचेशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता:– ला.प्र.वि. ठाणे परिक्षेत्र, ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर ठाणे (प) ४०० ०६१.
संकेत स्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in ई–मेल :– spacbthane@mahapolice.gov.in
ऑनलाईन तकार अॅप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :– १०६४ दुरध्वनि क्रमांक :– ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉट्स अॅप क्रमांक :– ९९३०९९७७००
अॅन्टी करप्शन ब्युरो, रायगड अलिबाग कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०२१४१–२२२३३१
मोबाईल क्र. ९७०२७०६३३३ (सुषमा सोनावणे),
९७३०२७१५६० (रणजित गलांडे),
९२८४३८९२८९ (किशोर साळे)
ईमेल आयडी – dyspacbraigad@gmail.com

(रणजित गलांडे)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, रायगड-अलिबाग